**MHOS070028282022**

**नियमित दिवाणी मुकदमा नं.६९७/२०२२ मधील नि.५ खालील आदेश**
***(धिरज बलदेवसिंग चव्हाण (राजपुत ) व इतर वि. गंगुबाई बलदेवसिंग चव्हाण (राजपुत ) व इतर )***

**१.** वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ नुसार प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त ताकिदीसाठी दाखल केला आहे.

**वादीचे कथन थोडक्यात असे की,**

**२.** वादी क्र.१ व २ हे सख्खे भाऊ-बहिण आहेत. प्रतिवादी क्र.१ ही वादींची सावत्र आई आहे. प्रतिवादी क्र.२ ही वादींची सावत्र बहिण आहे. तसेच प्रतिवादी क्र.३ ते ५ या वादीच्या आत्या आहेत. प्रतिवादी क्र.१ ही वादीचे वडील बलदेवसिंग चव्हाण (राजपुत) यांची दुसरी पत्नी आहे. वादी क्र. १ व २ हे मयत बलदेवसिंग किसनसिंग चव्हाण (राजपुत) यांच्यापासुन त्यांची पहिली पत्नी ज्योती हिला झालेली अपत्ये आहेत. वादी व प्रतिवादी हे एकत्र कुटूंबाचे अविभक्त घटक आहेत. वादींची सख्खी आई ज्योती ही दि. १५.१२.२००९ रोजी मरण पावली. वडील बलदेवसिंग किसनसिंग चव्हाण (राजपुत) हे दिनांक १८.०३.२०१४ रोजी मरण पावले. वादींची आजी शकुंतलाबाई ही दि.२४.०३.२०१३ रोजी मरण पावली. वादींचे आजोबा किसनसिंग मोतीसिंग चव्हाण (राजपुत) हे दि. १०.०६.२०१० रोजी मरण पावले. त्यांच्यापश्चात वादी व प्रतिवादी हे कायदेशीर वारस आहेत.

**३.** तालुका उमरगा येथील नगर परिषद हद्दीतील घरजागा क्र. १४७/1 वॉर्ड १७ ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ६६ फुट व रुंदी दक्षिण-उत्तर ३३ फुट आहे. सदर दावा मिळकतीस चतुःसिमा पुर्वेस विजयकुमार बाबाराव बिराजदार यांची जागा,

पश्चिमेस कृष्णाजी सदाशिव मुळे यांची जागा, दक्षिणेस- माधवराव मळगीकर यांची जागा, उत्तरेस-शंकरराव महादेव गुरव (कसगीकर) यांची जागा अशा आहेत. वास्तविक पाहता सदरची घरजागा ही शंकुतलाबाई किसनसिंग राजपुत (चव्हाण) यांनी खरेदीखत दस्त क्र. ४४८/१९८१ दि. ०५.०३.१९८१ रोजी खरेदी घेतलेली मिळकत आहे. परंतू कै. शंकुतलाबाई किसनसिंग राजपुत (चव्हाण) यांचे मृत्यूनंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीचे बनावट कागदपत्र दाखल करुन स्वतःच्या नावाने दावा मिळकतीची नोंद नगर परिषद रिव्हीजन रजिस्टरला केली आहे. दावा मिळकतीची अद्याप वादी व प्रतिवादी यांच्यात वाटण्या झालेल्या नाहीत.

४. यातील प्रतिवादी क्र.१ हिने वादी क्र.१ व २, तसेच प्रतिवादी क्र.३ ते ५ यांना बाजूला ठेवून स्वतःच्या नावे वारस प्रमाणपत्र घेतलेले आहे त्यानुसार केवळ प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाची नोंद झालेली आहे. वादीने सदर दावा मिळकतीचा हिस्सा मागितला असता प्रतिवादी क्र.१ ने देण्यास नकार दिला त्यामुळे वादीला सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द तुर्तातुर्त आदेश होण्यास विनंती केली आहे.

५. याउलट प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाव्याकामी आणि नि.क्र.५ च्या अर्जाच्या कामी नि.२१ कडे त्यांचे म्हणणे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादीने संदीग्ध व दिशाभूल करणारे कथने करुन सदरचा दावा दाखल केला आहे. सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ च्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ हिच्यासोबत बलदेवसिंग यांनी ज्योती हिच्या मृत्यूनंतर लग्न केलेले आहे. त्या लग्नसंबंधामुळे प्रतिवादी क्र.२ चा जन्म झाला. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत ही शकुंतलाबाई हिची स्वतंत्र मिळकत होती. बलदेवसिंग यांच्या मृत्यूनंतर वादी क्र.१ व २ चे मामा यांनी या दोघांना स्वतःकडे ठेवून घेतले. तसेच पेठसांगवी येथील जमीन गट क्र. २१४/२/२ क्षेत्र १- हे - ६२ - आर या मिळकतीस वादी क्र.१ चे नाव लावून घेतले. त्यावेळेस प्रतिवादी क्र.१ व २ यांना अंधारात ठेवले. प्रतिवादी क्र.१

ही पेठसांगवी येथील जमीनीची माहिती नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ हे पेठसांगवी येथील जमीनीबाबत प्रतिहक्क दावा करत आहेत. पेठसांगवी येथील गट क्र. २१४/२/२ ही वादी व प्रतिवादी यांचे आजोबा किसनसिंग यांची सकष्टार्जित मिळकत आहे. त्यामुळे त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांना हक्क व अधिकार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**६.** वादी तर्फे वकिल श्री. ए. झेड. कादरी व प्रतिवादी तर्फे वकील श्री. ए. पी. तोतला यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथने व प्रतिवादीचे म्हणणे तसेच दाखल कागदपत्रांचा विचार करता खालील मुद्दे खालील मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

| अ.नं | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस त्याच्या बाजूने असल्याचे शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| २. | तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर झाल्यास, वादीचे कशानेही न भरुन येणार असे नुकसान होईल, असे वादीने शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| ३. | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे, असे वादीने शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुददे क्र.१ ते ३ -**

**७.** मुददे क्र. १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतरित्या विचारात घेतले आहेत.

८. सदरहु अर्ज हा तुर्तातुर्त ताकीदीचा असल्यामुळे या दाव्याचे गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरी नाही. तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाचे बाजूने आहे व अर्ज नामंजूर केल्यास कोणाचे मोठया प्रमाणावर नुकसान होईल ही बाब विचारात घेणे जरुरीचे असते. वादीतर्फे वकील ए. झेड. कादरी यांचा युक्तीवाद विचारात घेता प्रतिवादी क्र.१ ही वादी क्र.१ व २ यांची सावत्र आई आहे. शकुंतलाबाई ही वादी यांची आजी असून ती दि. २४.०३.२००३ रोजी मरण पावली. वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे समान वारस असल्याकारणाने त्यांचा दावा मिळकतीमध्ये समान हक्क आहे. प्रतिवादी क्र.१ हिचे लग्न मयत बलदेवसिंग यांच्यासोबतचे दुसरे लग्न असल्याकारणाने तिला वादी क्र.१ व २ यांचे हक्क डावलता येणार नाहीत. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी क्र.१ व २ चा अधिकार आहे.

९. याउलट प्रतिवादी तर्फे वकील ए. पी. तोतला यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.१ चे लग्न बलदेवसिंग यांच्यासोबत प्रथम पत्नी ज्योती हिचा मृत्यूनंतर झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ चे बलदेवसिंग यांचेसोबतचे लग्न बेकायदेशीर आहे असे म्हणता येणार नाही. तसेच वादीच्या नावे पेठसांगवी येथील जमीन खरेदी केलेली आहे असे साफ चुकीचे आहे कारण वादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सदरचे खरेदीपत्र हे लिहून देणार म्हणून वादीचे आजोबा किसनसिंग मधुसिंग राजपुत यांचे नाव आहे. त्यामुळे वादी क्र. १ व २ आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या हक्कांबाबत पाहण्याचे झाल्यास दोघांना संपूर्ण मिळकतीमध्ये समान हिस्सा आहे. वादीने सदरचा दावा हा संपूर्ण माहिती लपवून केला असल्याकारणाने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**१०.** या अर्जाच्या अनुषंगाने दाखल असलेल्या सर्व कागदपत्राचे अवलोकन केले असता, मौजे उमरगा ता. उमरगा येथील घर क्र. १४७/१ वॉर्ड क्र. १७ या मिळकतीसाठी शकुंतलाबाई किसनसिंग राजपुत यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाची नोंद वहिवाटदार सदरी दिसून येते. तसेच दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३०/२०१८ मध्ये केवळ प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र दिसून

येते. याउलट प्रतिवादी यांनी या दाव्याकामी मौजे पेठसांगवी येथील गट क्र. २१४/२/२ चा सातबारा उतारा दाखल केलेला आहे. तसेच याच मिळकतीबाबतचा फेरफार पत्र दाखल केलेले आहे.

**११.** यामध्ये वादी व प्रतिवादी यांना त्यांचे नातेसंबंध मान्य आहेत. दाखल कागदपत्रांचा विचार करता प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावे उमरगा येथील घर क्र. १४७/१ वॉर्ड क्र. १७ ची नोंद दिसून येते. तसेच वादी क्र. १ च्या नावे पेठसांगवी येथील गट क्र. २१४/२/२ ची नोंद दिसून येते. या दोन्ही मिळकतीचा मुळ भोगवटादार यांचे नाव पहावयाचे झाल्यास नगर परिषद उमरगा येथील मिळकतीत वादीची आजी शकुंतलाबाई यांच्या नावाची नोंद दिसून येते. तसेच पेठसांगवी येथील मिळकतीत वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या आजोबांच्या नावाची नोंद दिसून येते. प्रथमदर्शनी पहावयाचे झाल्यास शकुंतलाबाई या वादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दि. २४.०३.२००३ रोजी मरण पावल्या. वादी क्र. १ व २ ची सख्खी आई ज्योती ही दि. १५.१२.२००९ रोजी मरण पावली व वडील बलदेवसिंग हे दि. १८.०३.२०१४ रोजी मरण पावले. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी या न्यायालयामध्ये बलदेवसिंग यांचे वारस असलेबाबत दाखविण्यासाठी वारस प्रमाणपत्र घेतलेले आहे. परंतू वादी क्र.१ व २ यांना सदर वारस प्रमाणपत्राबाबत या दाव्याकामी कोणतीही हरकत घेता येणार नाही. वास्तविक पाहता कोणतेही वारस प्रमाणपत्र हे पुर्ण न्यायालयीन चौकशी होवून जाहीर केले जाते. तसेच वादीनेच दाखल केलेल्या खरेदीपत्राच्या सत्यप्रतीनुसार पेठसांगवी येथे गट क्र. २१४/२/२ ही मिळकत केवळ वादी क्र. १ च्याच नावे खरेदी झाल्याचे दिसून येते. परंतू यावरुन प्रथमदर्शनी मिळकतींबाबतचे कौटूंबिक व्यवस्था केल्याचे वाटते. त्यामुळे नगरपरिषद उमरगा येथील दावा मिळकतीबाबत अथवा प्रतिवादीने प्रतिहक्क सांगितल्याप्रमाणे पेठसांगवी येथील गट क. २१४/२/२ या दोन्ही मिळकतींमध्ये हक्क अधिकार गुणदोषावर ठरणे उचित होईल. प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याच नावाची नोंद दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होईल असे वाटत नाही.

**१२.** तसेच न्यायाचा समतोल व प्रथमदर्शनी वहिवाटदार सदरी केवळ प्रतिवादी क्र.१ व २ चे नाव दिसून येते. सबब अर्जाचा विचार करता प्रथमदर्शनी वादी क्र.१ व २ आणि प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी अर्ज नामंजूर करणे उचित होईल. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

Digitally signed by GEETA PRAVIN BANKAR
Date: 2023.07.24 18:42:50 +0530

दि. २४.०७.२०२३ (गीता प्र. बनकर)

उमरगा सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरगा

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. D. B. Nikam |
| Court | --- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Omerga |
| Date | --- | 24-07-2023 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 24-07-2023 |
| Order uploaded on | --- | 25-07-2023 |